# प्रेसनोट

<u>राजीव गांधी प्राणीसंग्रहालयातील चितळ प्राण्यांच्या मृत्युबाबत.</u>

राजीव गांधी प्राणीसंग्रहालयात दि.०७/०७/२०२५ अखेर नर ३९ व मादी ६० असे एकूण ९९ चितळ प्राणी होते. तथापी दिनांक ०७/०७/२०२५ ते दिनांक १२/०७/२०२५ पर्यंत आजारपणाबाबत कोणतीही पूर्व लक्षणे न दाखविता एकुण १५ चितळ मृत पावले आहेत.

मृत प्राण्यांच्या शरीराचे अवयव व रक्ताचे नमुने तपासणीसाठी भारतीय पशुवैद्यकीय संशोधन संस्था,बरैली येथील National Referral Centre for Wildlife Diseases Monitoring and Prevention, ICAR चे National institute on Foot and Mouth Disease, भुवनेश्वर ओरिसा, National Institute of high security animal diseases, भोपाळ, विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा,पुणे ,विभागीय बन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्र गोरेवाडा ,नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. सदर प्राण्यांच्या मृत्युच्या कारणाबाबत अद्याप अचूक निदान होऊ शकलेले नाही.

तसेच चितळांच्या आरोग्य व उपचारा सम्बंधित भारतीय पशुवैद्यकीय संशोधन संस्था,बरैली येथील National Referral Centre for Wildlife Diseases Monitoring and Prevention येथील शास्त्रज्ञांशी तसेच प्राणीसंग्रहालयांच्या आरोग्य सल्लागार समितीतील तज्ञांशी सल्लामसलत करून मार्गदर्शन घेण्यात येत आहे.

उर्वरित चितळ खंदकाच्या परिसराचे निर्जंतुकीकरण करून परिसरातील प्राण्यांवर प्राणीसंग्रहालयातील पशुवैद्यकीय विभागातील कर्मचाऱ्यांद्वारे निरीक्षण ठेवण्यात येत आहे .तसेच इतर प्राण्यांच्या आरोग्य अबाधित राहावे याकरिता प्राणी संग्रहालयातय आवश्यक जैवासुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

दिनांक १३/०७/२०२५ पासून उर्वरित चितळ प्राण्यांच्या आरोग्यामध्ये सुधारणा होत असल्याचे निदर्शनास आले असुन आज दिनांक १५.०७.२०२५ रोजी पर्यंत एकही चितळ प्राण्याच्या मृत्युची नोंद नाही.

(डॉ.राजकुमार जाधव)
संचालक
स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय
पुणे महानगरपालिका

(डॉ.अशोक दि. घोरपडे)
मुख्य उद्यान अधिक्षक
पुणे महानगरपालिका